प्रेसनोट

दिनांक २६/०२/२०२०

**आरोपी बालाजी केशवराव भोसले वय ३७ वर्षे व्यवसाय शासकीय नोकरी पद तलाठी वर्ग–३ नेमणुक तहसील कार्यालय, निलंगा सज्जा उमरगा हाडगा व काटेजवळगा ता. निलंगा जि. लातूर रा. किल्लारी ता. औसा जि. लातूर यांनी तक्रारदार यांना १५,०००/– रुपयांची लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार व त्यांच्या भावाचे नावे मौजे खडकउमरगा शिवारातील गट नंबर १ व १४१ मधील वडीलोपार्जीत शेती ही वाटणीपत्राप्रमाणे तक्रारदार यांची पत्नी व भावजयांच्या नावे फेर करुन देण्याच्या कामासाठी तलाठी यांनी १५,०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार दिनांक २६/०२/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, लातूर. कार्यालय येथे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक २६/०२/२०२० रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी भोसले तलाठी यांनी **तक्रारदार व त्यांच्या भावाचे नावे मौजे खडकउमरगा शिवारातील गट नंबर १ व १४१ मधील वडीलोपार्जीत शेती ही वाटणीपत्राप्रमाणे तक्रारदार यांची पत्नी व भावजयांच्या नावे फेर करुन देण्याच्या कामासाठी १५,०००/–** रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवक बालाजी केशवराव भोसले, तलाठी यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक २६/०२/२०२० रोजी तलाठी यांच्या निलंगा येथील खाजगी कार्यालयात पाठविले असता आरोपी भोसले तलाठी यांनी तक्रारदार यांना १५,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम १८:४० वाजता पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन निलंगा येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे. पुढील तपास पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, सचिन धारेकर, शैलेश सुडे, दत्ता विभुते, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारीहे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड | :– | मोबाईलक्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– | मोबाईलक्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– | मोबाईलक्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– | मोबाईलक्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– | १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

( माणिक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर